News Line

# मॉडर्न हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे धडे

▮ पुणे : पंख संस्था व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पांतर्गत नववीतील विद्यार्थ्यांसाठी स्व-ओळख, ताणतणाव नियोजन, एच.आय.व्ही. एड्स, व्यसनाधीनता, लैंगिकता शिक्षण अशाप्रकारच्या वेगवेगळ्या विषयांवरची सत्रे घेतली जातात. मॉडर्न हायस्कूल मुलांचे, शिवाजीनगर येथे नुकताच हा प्रकल्प राबविण्यात आला. जीवनमूल्य प्रकल्पाचाच एक भाग म्हणून पोलिसांबरोबर हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमादरम्यान मुलांनी पोलिसांना वेगवेगळे प्रश्न विचारले व मुलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. यामध्ये छेडछाड, पॉक्सो कायदा, सायबर गुन्हे या विषयांचा समावेश होता. शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बापू शिंदे व पोलीस उपनिरीक्षक दीपक जाधव यांनी मुलांशी संवाद साधला. या कार्यक्रमासाठी पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भाबड, मॉडर्न हायस्कूलच्या मुख्याध्यापिका संगीता लकारे, उपमुख्यध्यापिका रोहिणी काळे, पर्यवेक्षिका सीमा कुळधारण व पंख टीम तसेच इतर शिक्षक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन पंखच्या क्षितिजा शिर्के यांनी केले. मॉडर्न हायस्कूलचे शिक्षक निवृत्ती गोपाळे यांनी आभार मानले.